Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक २०] सोमवार, मे ९, २०२२/वैशाख १९, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७२.

अध्यक्षा, नगर पंचायत, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रारूप विकास योजनेतील फेरबदलाच्या यादीचे प्रसिद्धीकरण

क्रमांक. वि.यो.हिंगणा-कलम-२८(४)-७२१.—

ज्याअर्थी, शासनाची अधिसूचना क्र. १८९९-११९१-प्र.क्र.८०-९८-९९-नवि-१३, दि. २३-०७-१९९९ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त महानगर क्षेत्राकरीता शासनाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४०९-२८९० प्र.क्र.-३५६-०९-नवि-०९, दि. ३१-०८-२०१० अन्वये नागपूर सुधार प्रन्यासची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. एमयुएन-२०१४-प्र.क्र.९८-नवि-१८, दि. १९ मार्च, २०१५ अन्वये उक्त अधिसूचित महानगर क्षेत्रातील मौजे हिंगणा हे महसुली गाव उक्त महानगर क्षेत्रातून वगळून हिंगणा नगर पंचायत हद्दीत समाविष्ट करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. एमयुएन-२०१४-प्र.क्र.९८-नवि-१८, दि. १९ मार्च, २०१५ अन्वये उक्त नगरपंचायत हिंगणा या क्षेत्राकरीता नगरपंचायत हिंगणा नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. अधिसूचित महानगर क्षेत्रातील मौजे हिंगणा हे महसुली गाव उक्त महानगर क्षेत्रातून वगळून हिंगणा नगर पंचायत हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, नगर पंचायतीने उक्त क्षेत्राची प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (या पुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम २६ अन्वये दि. २९-०२-२०२० रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेली असून, जनतेकडून विहित ३० दिवसांचे कालावधीत सूचना/हरकती मागविल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, शासनाची उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये नियुक्त नियोजन समितने प्राप्त आक्षेप/सूचना वरील सुनावणी बाबतचा अहवाल उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये नियोजन प्राधिकरणास दि. १०-०३-२०२२ रोजी सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, नियोजन प्राधिकरणाने (नगर पंचायत, हिंगणा) सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१, दि. २२-०३-२०२२ अन्वये नियोजन समितीचे अहवालास उक्त अधिनियमाचे कलम २८(४) अन्वये मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) अन्वये नियोजन प्राधिकरणाने उक्त प्रारूप विकास योजनेत सुचविलेले बदल, उक्त प्रारूप विकास योजना शासनास सादर करण्यापूर्वी जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

आता, त्याअर्थी, हिंगणा नगर पंचायत क्षेत्राची प्रारूप विकास योजना उक्त बदलासह शासनास सादर करणेस्तव तयार करण्यात आलेली असून, सदर प्रारूप विकास योजनेत नियोजन प्राधिकरणाने सूचविलेले बदल दर्शविलेले असून, सदर प्रारूप विकास योजना जनतेच्या अवलोकनार्थ याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व अहवाल अवलोकनार्थ, मुख्याधिकारी, नगर पंचायत, हिंगणा व सहाय्यक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, प्रशासकीय ईमारत क्र. १, दुसरा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील.

सौ. लता डार्वीन गौतम,

हिंगणा : अध्यक्षा,

दिनांक ९ मे २०२२. नगर पंचायत, हिंगणा.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७३.

BY PRESIDENT, NAGAR PANCHAYAT

Publication of list of modfications in Draft Development Plan of Hingna, under Section 28(*4*) of Maharashtra Regional ans Town Planning Act, 1966

No. D.P. Hingna-Sect-28(*4*)-721.—

Whereas, Government of Maharashtra *vide* Notification No. 1899-1191-CR-80-98-99-UD-13, dated 23-7-1999 constituted Nagpur Metropolitan Area.

And whereas, Government of Maharashtra, Urban Development Department *vide* Notification No. TPS-2409-2890-PR-356-09-UD-9, dated 31-8-2010 appointed NIT Nagpur as Special Planning Authority for said area.

And whereas, Government of Maharashtra, Urban Development Department *vide* Notification No. MUN-2014-C.R.-95-UD-18, Dated 19-03-2015 included the area of Revenue villages of Mouze Hingna in Nagar Panchayat, Hingna.

And whereas, Government of Maharashtra, Urban Development Department *vide* Notification No. MUN-2014-C.R.-95-UD-18, Dated 19-03-2015 declares the Nagar Panchayat, Hingna. Being a local authority shall be the Planning Authority for above said Nagar Panchayat area.

And whereas, Nagar Panchayat, Hingna has published Draft Development Plan for the said area under Section 26 of MRTP Act, 1966 (hereinafter it is referred to as the " said Act ") on dated 29-02-2020 in Government Gazette and invited objections/suggestions from the general public within the period of 30 days.

And whereas, the Planning Committee constituted under Section 28(*2*) of the said Act has given hearing on the objections and suggestions so received and submitted its report to the Planning Authority on dated 10-3-2022.

And whereas, the Planning Authority *i.e.* Nagar Panchayat, Hingna *vide* Resolution No. 01, dated 22-03-22 has approved the report under Section 28(*4*) submitted by Planning Committee under Section 28(*3*) of the said Act.

And whereas, it is necessary to publish the list of modification for changes made under sub-section (4) of Section 28 of said Act, before such submission to Government.

Now, therefore, this notice is here by published to inform that said Draft Development Plan of Hingna, Nagar Panchayat area is ready for submission to the State Government for sanctioning.

The list of modifications is published for inspection to the public in the office of the Chief Officer, Nagar Panchayat, Hingna and Assistant Director of Town Planning, Branch Office, Administrative Building No. 1, Second Floor, Civil Lines, Nagpur during office hours on all working days.

Sau. LATA DARWIN GAUTAM,

Hingna : President,

Dated the 9th May 2022. Nagar Panchayat, Hingna.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.